# मिरा भाईंदर महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग
जा.क्र.मनपा/सा.प्र./- ९८७ -/2021
दि.१९/०७/2021

**॥ परिपत्रक ॥**

**विषय:- मा.महापौर यांचे दालनात आयोजित होणाऱ्या बैठकीबाबत.**
**संदर्भ:- मा.महापौर यांचे जा.क्र.मनपा/महापौर/256/2020-21 दि.15/07/2021 रोजीचे पत्र.**

महापालिकेच्या विविध विभागांच्या महत्वाच्या विषयांवर चर्चा विनिमय करणेकामी मा.महापौर महोदया यांचे दालनात वेळोवेळी बैठकीचे आयोजन करण्यात येते. सदर बैठकीस संबंधित अधिकाऱ्यांना उपस्थित राहणेबाबत मा.महापौर यांचे दालनातून लेखी पत्रान्वये/ व्हॉट्सअॅप/मॅसेज व भ्रमणध्वनीद्वारे संपर्क केला जातो.

सदर बैठकीस संबंधित अधिकारी कधीच वेळेवर उपस्थित राहत नसल्याने मा.महापौर/ मा.पदाधिकारी यांची गैरसोय होत असुन कार्यालयीन कामकाज वेळेत करणेकामी अडथळा निर्माण होत असलेबाबत संदर्भिय पत्रान्वये नाराजी व्यक्त केलेली आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख/ खातेप्रमुख यांना सूचित करण्यात येते की, यापुढे मा.महापौर यांचे दालनात आयोजित होणाऱ्या बैठकीस संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत उपस्थित राहणेबाबत दक्षता घेण्यात यावी.

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**विभागप्रमुख/ खातेप्रमुख (सर्व)**
मिरा भाईंदर महानगरपालिका.
/- आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

**प्रत:- माहितीस्तव सविनय सादर,**

1) मा.महापौर सो., मिरा भाईंदर महानगरपालिका.
2) मा.आयुक्त सो., मिरा भाईंदर महानगरपालिका.
3) मा.अतिरिक्त आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका.

# ज्योत्स्ना जालींदर हसनाळे

## ( उर्फ सौ. पुजा प्रताप शिंदे)

## महापौर

जा.क्र.मनपा/महापौर/२५६/२०२०-२१ मिरा भाईंदर महानगरपालिका  दि. १५/०७/२०२१

प्रति,
मा. आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- माझे दालनातील बैठकीच्या उपस्थितीबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यांत येते की, काही महत्वाच्या विषयांवर चर्चा विनीमय करणेकामी माझे दालनात वेळोवेळी बैठकीचे आयोजन करण्यात येत असुन संबंधीत अधिकाऱ्यांना उपस्थित राहणेबाबत बैठकीचे पत्र, व्हॉट्सॲपद्वारे मॅसेज तसेच भ्रमणध्वनीवरुन बैठकीबाबत संपर्क केला जातो, तसेच सदर बैठकीच्या दिवशी देखील त्यांना वारंवार संपर्क करावा लागतो ही खेदाची बाब आहे.

सबब आपल्या निर्दशनास आणू इच्छिते की, आजपर्यंत आयोजित केलेल्या कोणत्याही बैठकीस संबंधीत अधिकारी कधीच वेळेवर उपस्थित राहत नसल्याने माझी व इतर पदाधिकाऱ्यांची गैरसोय होत असुन कार्यालयीन कामकाज वेळेत करणेकामी अडथळा निर्माण होत आहे.

तरी यापूढे माझे दालनातून आयोजित करण्यात येणाऱ्या बैठकीस अधिकाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहणेबाबत आपणांकडून सर्व विभागप्रमुखांना आदेशित करावे.

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे -४०१ १०१ दूरध्वनी : 022-2819 2005